N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर    **P.S.(ठाणे):** शाहुवाडी

   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0077    **Year (वर्ष):** 2025

   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/03/2025 10:50

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन    **Date From (दिनांक पासून):** [illegible]/02/2025

      **Time Period (कालावधी):**    **Date To ( दिनांक पर्यंत):** 18/03/2025

      **Time From (वेळेपासून):** 12:48 बजे

      **Time To (वेळेपर्यंत):** 21:57 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

   **Date (दिनांक ):** 19/03/2025    **Time (वेळ):** 08:30 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

   **Entry No. (नोंद क्र.):** 007

   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/03/2025 09:11 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

   उत्तर, 1 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** करजोंशी, ताशाहुवाडी, व मलकापू,शाहुवाडी

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भरत उर्फ सुरेश हरिदास पटेल

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1977

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | येळाणे, ,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | येळाणे, ,शाहुवाडी,शाहुवाडी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8669050794

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश जगन्नाथ खोत | | | 1. भैरेवाडी,,शाहुवाडी,शाहुवाडी, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 200000 रुपये भारतीय चलनाच्या नोटा व चिल्ड्रन बकेच्या 500 असे छापलेल्या 600 नोटा | 500,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

500,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी भरत उर्फ सुरेश हरिदास पटेल, वय 48 वर्षे,व्यवसाय-बिल्डींग मटेरियल पुरविणे, रा.मलकापूर एस.टी. स्टॅण्ड समोर, कोल्हापूर-रत्नागिरी रोड, येळाणे, ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर मो.नं. 8669050794 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 04/02/2025 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, मौजे सावे येथील गट नंबर 616 मधील 1 हेक्टर 32 आर जमीन माझे मामेभाऊ मगनलाल लखमसिंग पटेल तसेच लक्ष्मण नारायण पटेल, रमेश नारायण पटेल व विनोद दायालाल पटेल यांनी जमीन मालक आनंदा महादेव अस्वले, गणेश बंडु पाटील व श्रीकांत हरी भोसले यांचेकडुन दिनांक 18/03/2014 रोजी खरेदी केलेली आहे. त्याचा फेरफार नं.1311 असा आहे. सदर फेरफार मध्ये मामेभाऊ मगनलाल यांचेसह त्यांचे जोडीदार अशा चौघांची नावे नोंद आहेत. परंतु त्या गटामध्ये व क्षेत्रात फेरफार नं. 322 प्रमाणे दोन फेरफार नोंद झाले आहेत. गट नं.616 मधील फेरफार खाडाखोड करून त्यामध्ये चुकीचे गट नंबर नोंद केलेले आहेत. तरी सदर फेरफार मध्ये खाडाखोड करणा-यां विरूध्द योग्य ती कारवाई करून पुर्ववत सातबारा व फेरफार दुरूस्ती करून मिळावा, म्हणुन मामेभाऊ मगनलाल यांचेसह त्यांचे जोडीदार यांनी दिनांक 06/02/2023 रोजी तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे अर्ज दिला होता. सदर अर्जाप्रमाणे काय कार्यवाही केली व कामाचा पाठपुरावा शाहुवाडी तहसिलदार ऑफीस येथे जावुन करणेबाबत मला मगनलाल याने सांगितले होते. त्याप्रमाणे मी सदर कामाबाबत वेळोवेळी तहसिलदार कार्यालयात जावुन विचारणा करत होतो,परंतु तेथुन समाधानकारक उत्तरे मिळत नव्हती. त्याबाबत मी वेळोवेळी मगनलाल यांना कळवित होतो. सद्या दिले अर्जामध्ये शाहुवाडी तहसिलदार यांचेसमोर सुनावणी असल्याने. दिनांक 27/01/2025 रोजी मी मगनलाल यांनी वर दिले अर्जाची पुढील सुनवाणी कधी आहे तसेच अर्जाची सध्यस्थिती काय आहे हे विचारणा करणेसाठी तहसिलदार ऑफीस शाहुवाडी येथे गेलो होतो, तेथे ओळखीचे सुरेश खोत माझेकडे आले. त्यांनी मला माझे मगनलाल यांचे सावे येथील गटाचे काम प्रलबिंत आहे का? असे विचारले असता मी त्यांना होय असे सांगितले. सुरेश खोत यांनी मला शाहुवाडी तहसिलदार कार्यालयात सुनवाणीवर प्रलबिंत असलेले मौजे सावे येथील गट नंबर 616 बाबतचे काम तहसिलदार शाहुवाडी चव्हाण साहेब यांचेकडुन पुर्ण करून देतो, त्याकरीता चव्हाण साहेब यांना देणेसाठी माझेकडे 5,00,000/- रूपयांची लाच मागणी केली. मी त्यांना काम पुर्ण होणार का असे विचारले असता, त्यांनी चव्हाण साहेबांकडुन काम पुर्ण करून देणेची माझी जबाबदारी, त्याकरीता तुम्ही 5,00,000/- रूपये तयार ठेवा असे म्हणाले. मी मगनलाल यांना तसेच जमीनीतील इतर सह हिस्सेदार यांना विचारणा करून तुम्हाला कळवितो असे सांगुन निघुन आलो होतो. मी एंजट सुरेश खोत यांना दिनांक 05/02/2025 रोजी भेटण्यास जाणार असुन त्यांचेवर आपणाकडुन कायदेशीर कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगितली. तसेच मी अँन्टी करप्शन ब्युरो येथे तक्रार देणार असुन सदर तक्रार मला देणेकरीता मामेभाऊ मगनलाल यांनी संमतीपत्र दिल्याचे सांगितले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला त्या पुढील कारवाई करीता दिनांक 05/02/2025 रोजी दुपारी 12.00 वा सुमा.येळाणे, ता.शाहुवाडी येथे येत असल्याचे कळविले.

मी व पाटील मॅडम एकमेकांचे संपर्कात होतो. दिनांक 05/02/2025 रोजी 12.00 वा चे सुमारास पाटील मॅडम त्यांचा स्टाफ, पंच माझे शिवम प्लायवुड (लिबांनी एंटरप्रायझेस) येळाणे येथे आले. त्यावेळी पाटील मॅडम यांनी मला शासकीय दोन्ही पंच, स्टाफ यांची ओळख करून दिली. त्यांचे सुचनेवरून पंचानी मला माझी तक्रार विचारली, त्यावर मी त्यांना वरील प्रमाणे माझी तक्रार सांगितली. त्यानंतर तक्रारी अर्ज व संमतीपत्र पाटील मॅडम यांचेकडे दिला. तक्रारी अर्जावर व संमतीपत्रावर पाटील मॅडम व पंचानी सहया केल्या. पाटील मॅडम यांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन एंजट सुरेश खोत हे माझेकडे मागत असलेल्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. मी

माझ्या वरील मोबाईल वरून सुरेश खोत यांचे मोबाईल क्रमांक 7745075200 वरती दुपारी 12.46 वा चे सुमारास फोन केला असता, त्यांनी फोन उचलला नाही. थोडयावेळाने सुरेश यांना फोन केला त्यावेळी सुरेश यांनी फोन उचलला व मला व्हाटसअप अँपवर व्हाईस कॉल करणेस सांगितला त्यानंतर मी त्याला 12.47 वा चे सुमारास व्हॉटसअप वरून व्हाईस कॉल केला. सुरेश "आत्ता ऑफिसला आल्यात ते, झाल माझ बोलण..." असे बोलले. त्यावेळी मी हां... असे म्हणालो. त्यावेळी सुरेश खोत "तर ते म्हणले, कशाला तु घेवुन येतोस काय, तुला सांगितलय ना, कशाला तु घेवुन येतोस त्यासनी, तु कर नी,निकाल तुझ्या हातात घेवुन तेला देवुन ये जा, आस म्हणत्यात ते" असे म्हणाले. त्यावेळी मी "तहसिलदार साहेबांचा,चव्हाण साहेबांचा आकडा काय, किती आला ते तुला, मी सांगितलेल विचारायला" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश खोत "तुला बोललो नाही का मी" असे म्हणाले. त्यावेळी मी "आर बोललास किती" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश "तुला ते राती तिथ बोललो नाही का" असे म्हणाला. मी " किती पण,फायनल किती म्हणत्यात" असे विचारले असता सुरेश "अहो ते पाचच्या खाली इना, पाचच म्हणतय ते, मी तेला विचारलय" असे म्हणाला. त्यावेळी मी "पाच...पाच लाख म्हणत्यात"... असे विचारले असता सुरेश खोत "आर व्हय. मग तुला, मी तेवढयासाठी बोललो होतो तुला" असे म्हणाले. त्यानंतर माझेत व सुरेश यांचेत पैसे कमी करण्यावरून तसेच कामाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी सुरेश खोत " आज म्हणलास कणाय तु, आज पैसे जमा केल की तु, मी तुला निकाल आणुन देतो, काय टेन्शन नाही. आणि विश्वास ठेव माझ्यावर, बघ मला तुमच्यातल एक रूपाया नग " असे म्हणाले. मी सुरेश याला "मी काय म्हणतोय, तहसिलदार साहेबान्सी आपण दोघं भेटलो असतो ना" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश "तुला सांगु, तुला पाहिजे आसल तर तु जावुन भेट,पण ते पैशाच तुझ्याकड आजिबात काय बोलत नाही हां त्यो, मला पैसे नगो मला पैसे नगो, असा विषय हाय" असे म्हणाले. त्यावेळी मी " तु बोल ना, तु बोल की साहेबांन्सी" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश "आर नाही नाही मी बोललोय की, बर तेन मला सांगितलय ना रे" असे म्हणाले. पुन्हा आमचेत कामाचे अनुषंगाने बोलणे झाले, त्यावेळी मी सुरेश यांना मगनलाल ला विचारून मी तुला फोन करतो असे सांगुन फोन बंद केला. सदरचा कॉल पाटील मॅडम यांनी रेकॉर्डवर रेकॉर्ड केला. सुरेश यांना भेटुन पुढील कारवाई करण्याचे ठरले. मी सुरेश नेमका कोठे भेटतो याकरीता त्याचे मोबाईलवर पुन्हा फोन केला त्यावेळी आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी सुरेश याने मला "कामासाठी पैसे तयार ठेव निकाल आणुन देतो, तसेच तेला ते सांगणार घरात जावुन, की साहेब (तहसिलदार चव्हाण साहेबांना) आल्यात, ते सांगितल्याल्या पध्दतीन झाल" असे म्हणाला. तसेच सुरेश हा करंजोषी येथे येणार असल्याचे त्याने मला सांगितले. त्यानंतर सुरेश याला भेटण्यास जाणेपुर्वी पाटील मॅडम यांनी मला पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे सहयाने गळयात अडकवुन मला व पंच नं.1 माने यांना सुरेश खोत यांना भेटणेकरीता दुपारी 1.14 वा चे सुमारास पाठविले. आम्ही माझेकडील व्हॅगन आर कार नं. डभ्.09.ळड.7097 मधुन करंजोषी फाटा येथे गेलो. तेथे मी सुरेश याला फोन केला, व मी करजोंशी फाटा येथे आल्याचे सांगितले. सुरेश व माझेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी सुरेश खोत "आता बग, माझ ऐक की, ऐक तुझ नी माझ बोलण झाल ना, पाचचा विषय. तु घेवुन मला दे, मी तुला लगेच तो निकाल आणुन देतो, आता काय झालय, ते आता मिटींग मध्ये हाईत" असे म्हणाले. त्यावेळी मी हं असे म्हणालो. सुरेश याने तु मला पैसे दिलेनंतर चव्हाण साहेबांचेकडुन सावे येथील काम करून घेतो या अनुषंगाने बोलने झाले. मी सुरेश याला आपण भेटुन बोलुया असे म्हणालो. त्यानंतर आम्ही सुरेश यांना प्रत्यक्ष राधाकृष्ण धाब्याचे समोर भेटलो. त्यावेळी कामाचे अनुषंगाने सुरेशचे व तहसिलदार चव्हाण यांचे आताच बोलने झाल्याचे सांगितले. मी त्याला मगनलाल हे चव्हाण साहेबांना भेटणार असल्याचे सांगितले यावेळी सुरेश याने मला मगनलाल यांना फोन लावणेस सांगितला मी फोनवर मगनलाल याला " पाच लाख रूपये म्हणतोय सुरेश, साहेबान्सी दयायला पाहिजेत, चव्हाण साहेबान्सी तहसिलदार साहेबान्सी" असे म्हणालो त्यावेळी मगन पटेल "एवढ सांगितला" असे म्हणाला. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने पुन्हा बोलने झाले. त्यावेळी मी मगनलाल यांना " मगन हयो पाच लाखाच्या खाली साहेब सही करणार नाही म्हणतोय" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश " नाहीच म्हणतोय त्यो" असे म्हणाले. साहेबांना भेटुन बोलतो असे आम्ही म्हणालो असता सुरेश " साहेब बोलतो का कधी, साहेब बोलालाय का कधी कुणाकड" असे म्हणाला. त्यानंतर माझे सुरेश खोत याचेसोबत पैशाची जुळणा करणेचे अनुषंगाने बोलने झाले. तसेच चव्हाण साहेबांना भेटुन, पैसे कमी करण्याबाबत रिक्वेस्ट करून बघतो असे बोलने झालेनंतर आम्ही परत मॅडम थांबलेल्या ठिकाणी दुपारी 1.41 वा चे सुमारास येवुन घडलेली हकीकत सांगितली.

त्यानंतर मी पाटील मॅडम यांना सांगितले की, तहसिलदार चव्हाण साहेब हे मगनलाल पटेल यांचे परिचयाचे असल्याने मी मगनलाल पटेल यांचे सोबत तहसिलदार चव्हाण साहेब यांची भेट घेतल्यानंतर तहसिलदार चव्हाण हे स्वतः लाचेची मागणी करण्याची किंवा एजंट सुरेष खोत याचे लाच मागणीस दुजोरा देण्याची षक्यता आहे. त्यानंतर मी पाटील मॅडम यांचे सुचनेवरून मगनलाल पटेल यांना येळाणे येथे बोलावुन घेतले. मॅडम यांनी मला, मगनलाल व

पंच नं. 1 माने यांना तहसिलदार चव्हाण यांचे लाच मागणीचे पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे सहयाने गळयात अडकवुन मला, पंच माने व मगनलाल यांना तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे दुपारी 3.15 वा चे सुमारास पाठविले. तेथे मला सुरेश खोत याचा फोन आला, त्याने मला चव्हाण साहेब यांना भेटू नको नाहीतर बजेट वाढणार असल्याचे सांगुन पंचायत समिती शाहुवाडी येथे भेटण्यासाठी या असे सांगितले. त्यानंतर आम्ही तहसिलदार साहेबांचे कार्यालयाचे बाहेर येवुन थांबलो. तेथे तहसिलदार साहेब यांचेबाबत विचारणा केली असता तहसिलदार चव्हाण हे मिटींग मध्ये असल्याने ते कार्यालयात 5.00 वा. येणार असल्याने, आम्ही तिघे तेथुन निघुन मॅडम थांबले ठिकाणी येवुन त्यांना घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पाटील मॅडम यांनी मला, मगनलाल व पंच नं.1 माने यांना तहसिलदार चव्हाण यांचे लाच मागणीचे पडताळणीचे अनुषंगाने पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला, पंच माने व मगनलाल यांना तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे पाठविले. त्यावेळी तेथे मी कार्यालयातील एका अनोळखी इसमाशी निकालाचे अनुषंगाने बोलत असताना मला सुरेश खोत याचा परत फोन आला. त्याला मी तहसिलदार चव्हाण यांना समक्ष भेटुन येतो, असे सांगितले. त्यानंतर आम्ही तहसिलदार चव्हाण साहेब यांना भेटलो. आमचेत कामाचे अनुषंगाने तसेच निकालाचे अनुषंगाने बोलने झाले. मी त्यांना काम कधीपर्यंत होईल असे विचारले, चव्हाण साहेब यांनी दोन दिवस लागतील जास्तीत जास्त, आज बुधवार हो, असे म्हणाले. त्यावेळी मी, मगनलाल व चव्हाण साहेब यांचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी "जरा साहेब लवकर करून घ्या" असे म्हणालो. त्यावेळी चव्हाण साहेब "देतो देतो.." असे म्हणाले. त्यानंतर आम्ही मॅडम थांबलेल्या ठिकाणी दुपारी 3.56 वा चे सुमारास परत येवुन घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर सुरेश यांचा मला फोन आला. त्यावेळी आमचेत तहसिलदार कार्यालयात चव्हाण साहेबांना भेटून आल्याचे अनुषंगाने बोलणे झाले व तहसिलदार चव्हाण यांनी निकाल देण्यासाठी दोन दिवस लागणार असल्याने दोन दिवस थांबण्यास सांगितल्याने, तहसिलदार यां त्यानंतर सुरेश यांचा मला फोन आला. त्यावेळी आमचेत तहसिलदार कार्यालयात चव्हाण साहेबांना भेटून आल्याचे अनुषंगाने बोलणे झाले व तहसिलदार चव्हाण यांनी निकाल देण्यासाठी दोन दिवस लागणार असल्याने दोन दिवस थांबण्यास सांगितल्याने, तहसिलदार यांना दोन दिवसानी पुन्हा भेटुन पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरले. पाटील मॅडम यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 03/03/2025 रोजी पाटील मॅडम यांना दुपारी 02.00 वा चे सुमारास मी फोन करून, तहसिलदार चव्हाण साहेब यांना सायंकाळी 04.00 वा चे सुमारास भेटणेसाठी मी व मगनलाल जाणार आहे असे सांगितले. त्यांनी मला त्या, पंच व स्टाफसह येळाणे येथे पोहचत असल्याचे सांगितले.. त्याप्रमाणे पाटील मॅडम, पंच व स्टाफसह सायंकाळी 5.15 वा चे सुमारास आल्या. त्यानंतर मॅडम यांनी मला, मगनलाल व पंच नं. 1 माने यांना तहसिलदार चव्हाण यांचे लाच मागणीचे पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे सहयाने गळयात अडकवुन मला ,पंच माने व मगनलाल यांना तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे सायंकाळी 05.47 वा चे सुमारास पाठविले. त्यावेळी मी व मगनलाल यांनी तहसिलदार चव्हाण यांची भेट घेतली त्यावेळी चव्हाण हे " देतो दोन दिवसात" असे बोलले. त्यावर मी "करा की लवकर" असे बोललो. त्यावेळी मगन पटेल "दोन दिवसाच काय" असे बोलले. मी "साहेब आता आम्ही बरेच हेलपाटे झाले आहेत आता त्यामुळ आता करा " असे बोललो. चव्हाण साहेब "नाही देतो हो, दोन दिवसात एकशे एक टकका देतो हां, मला दोन दिवस दया, हां" असे बोलले. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी चव्हाण साहेब यांना तुमच्याशी जरा बोलायच होत...असे म्हणालो. त्यावेळी चव्हाण साहेब नाही,नाही, काय काय गरज नाही, मी देतो निकाल... असे बोलले. त्यावर मी " हं. त्या सुरेशचा निरोप होता " असे बोललो. त्यावेळी चव्हाण साहेब "नाही, नाही काय नाही, आजिबात काय कोणाला बोलु नका" असे बोलले. त्यानंतर चव्हाण साहेब मिटींगला चाललोय असे सांगुन निघुन गेले. त्यानंतर आम्ही मॅडम थांबलेल्या ठिकाणी सायंकाळी 6.27 वा चे सुमारास परत येवुन घडलेली हकीकत सांगितली. मी पाटील मॅडम यांना तहसिलदार चव्हाण साहेब यांनी निकाल देण्यासाठी दोन दिवसांनी तहसिलदार कार्यालयामध्ये येण्यास सांगितले असल्याने त्यावेळी तहसिलदार चव्हाण हे माझेकडे लाच मागणी करण्याची दाट शक्यता असल्याने आपण पुढील कारवाई करावी अशी विनंती केली. त्याप्रमाणे पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरल्यानंतर मॅडम यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 13/03/2025 रोजी तहसिलदार चव्हाण यांचे लाच मागणीचे पडताळणी करीता मी, पंच नं.1 माने असे तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे गेलो होतो. त्यावेळी तेथे तहसिलदार चव्हाण साहेब मिटींग करीता कोल्हापूर येथे गेले असल्याने त्यांची भेट झाली नाही. त्यानंतर पाटील मॅडम यांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 17/03/2025 रोजी मी पाटील मॅडम यांना फोन केला व दिनांक 18/03/2025 रोजी मी तहसिलदार चव्हाण भेटणेसाठी जाणार आहे असे सांगितले. त्यांनी दिनांक 18/03/2025 रोजी पंच व स्टाफसह

येत असल्याचे सांगितले, त्याप्रमाणे पाटील मॅडम पंच व स्टाफसह सकाळी 11.30 वा चे सुमारास आल्या. त्यानंतर मॅडम यांनी मला व पंच नं. 1 माने यांना तहसिलदार चव्हाण यांचे लाच मागणीचे पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे सहयाने गळयात अडकवुन मला व पंच माने यांना तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे दुपारी 1.27 वा चे सुमारास पाठविले. तेथे मी कार्यालयातील शिपाई याला साहेब आहेत ना? असे विचारले असता, त्याने मला समोर दिसत्यात नव्ह असे म्हणाले. मला सुरेश खोत याचा व्हाटसअप ॲप वरती फोन आला, त्यावेळी त्याने मला आलाय काय असे विचारले? मी त्याला दहा पंधरा मिनिटात पोहचणार असे सांगितले. त्यावेळी आमचेत मगन आला नसल्याचे व कामाचे अनुषंगाने बोलने झाले. मी त्याला मगन आला की फोन करतो असे म्हणालो, व फोन बंद केला. तहसिलदार ऑफीस मध्ये मिटींग चालु असल्याने तहसिलदार यांची मिटींग झालेनंतर भेट होणार असल्याने मी व पंच तेथुन निघुन मॅडम थांबलेल्या ठिकाणी दुपारी 1.55 वा चे सुमारास परत येवुन घडलेली हकीकत सांगितली. काहीवेळाने पुन्हा मॅडम यांनी मला व पंच नं.1 माने यांना चव्हाण साहेब यांचे लाचेच्या मागणीचे पडताळणीचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच माने यांना तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे दुपारी 3.51 वा चे सुमारास पाठविले. मी तेथे चव्हाण साहेब यांना भेटलो त्यावेळी त्यांनी मला पटेल का? असे म्हणुन, साव्याचे काम का ? असे विचारून दहा मिनीट थांबणेस सांगितले. पुन्हा मला सुरेश खोत याचा फोन आला, त्यावेळी त्याने तो बांबवडयात आल्याचे सांगितले. मी त्याला थांब येतो तेथे असे म्हणालो. त्यानंतर मी पुन्हा चव्हाण साहेबांना भेटलो, त्यावेळी त्यांनी मला पुन्हा दहा पंधरा मिनट थांबणेस सांगितले. पुन्हा मला सुरेश याचा फोन आला, त्यावेळी त्याने मला "तस फार तर,तिथ येतो मी, कितीबी वेळ होवुदे" "मग तेज्या हातात देवु ऑर्डर आणि मग विषय संपवुन टाकु " असे म्हणाला. त्यानंतर मी पुन्हा तहसिलदार चव्हाण यांना भेटलो असता आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले मी "अहो त्यो सुरेश हाय कणाय, त्यो सारखा फोन करतोय मला" असे म्हणालो. त्यावेळी चव्हाण साहेब "अहो कोण सुरेश आणि काय आयकु नका हो कुणाच" असे म्हणाले. त्यावेळी मी "चालतय शुक्रवारी साहेब" असे म्हणालो. त्यावेळी चव्हाण साहेब "शुक्रवारी मला सकाळी फोन करा, कुणाच ऐकु नका कोण सुरेश खोत आणि हित ना हे असलेच धंदे हाईत हेंचे, तहसिलदारच्या नावावर सगळयांचे पैसे खायचे, आम्हाला माहित बी नसतो विषय, काय चाललय हेंच" असे म्हणाले.त्यावेळी मी त्यो आता सारखा फोन करतोय . त्यावेळी चव्हाण साहेब "हे आसलच हाय हित शाहुवाडीत" असे म्हणाले. त्यानंतर ते शुक्रवारी काम देतो असे म्हणाले. त्यानंतर आम्ही मॅडम थांबलेल्या ठिकाणी सायकाळी 7.08 वा चे सुमारास परत येवुन घडलेली हकीकत सांगितली. तहसिलदार चव्हाण साहेब यांनी सुरेश खोत याने माझेकडे मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत पैसे कोणाला ही देवु नका, असे मला सांगितले. परंतु सुरेश खोत याने तहसिलदार यांचेकडुन माझे मामेभाऊ मगनलाल यांचे सावे येथील जमीनीचे कामाचा आदेश काढुन घेतो, त्याकरीता तहसिलदार चव्हाण यांना 5,00,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे पाच लाख रूपये मागत असलेचे निषन्न झाल्याने तसेच सदरचे पैसे घेवुन त्याने आजच ये, किती पण वेळ होवु दे, फोन कर असे म्हणालेने पाटील मॅडम यांनी सुरेश खोत याचे लाच मागणीचे अनुषंगाने सापळा कारवाई सुरू केली.

त्यावेळी पाटील मॅडम यांनी लाच रक्कम बाबत मला विचारणा केली, त्यांना माझेकडे 2,00,000/- रूपये असलेबाबत सांगितले. परंतु सुरेश खोत यांनी माझेकडे 5,00,000/- रूपयांची मागणी केली आहे त्यामुळे, त्यांना 5,00,000/- रूपये दिले पाहीजेत असे सांगितले. त्यानंतर पाटील मॅडम यांनी 500/- रू असे लिहलेल्या चिंल्डर्स बॅंक च्या लहान मुलाच्या खेळण्यातील 600 नोटा उपलब्ध केल्या. त्यामुळे एकुण 5,00,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध झाली. पाटील मॅडम यांनी मला व पंचाना अँथ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावुन, अल्ट्रा व्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही, केलेनंतर अँथ्रासिन लावलेले 5,00,000/- किमंतीचे 500 रूपयचे वेगवेगळे 10 बंडल तयार करून एकत्र केले. त्यानंतर मी सुरेश याला रात्री 9.15 वा चे सुमारास व्हाटसअप कॉल केला, सुरेश याने माझा कॉल उचलला त्याचे व तहसिलदार चव्हाण यांचेल समक्ष चालु असलेले बोलने मला ऐकवले. त्यावेळी सुरेश व तहसिलदार चव्हाण हे बोलत असुन चव्हाण हे सुरेश याला माझा फोन घेवु नको, ते सारख फोन करतय,ते प्रकरण लय दिवस पेंडींग आहे, असे म्हणाले. त्यावेळी सुरेश याने चव्हाण साहेब यांना ते मघाशी बी आलत होय, तुमच्याकडे असे विचारले. त्यावेळी चव्हाण हो म्हणाले. त्यावेळी चव्हाण साहेब परत सांगतो त्या दोघांत तुमच्या जवळचा कोण हाय असे म्हणाले. त्यावेळी त्यो सुरेश पटेल, माझ्या जवळचा मित्र हाय, साहेब, विश्वासु आहे असे म्हणाला. त्यावेळी चव्हाण विश्वास ठेवु नका असे म्हणाले. त्यानंतर सुरेश याने माझा फोन कट केला.

त्यानंतर लगेचच सुरेश खोत याचा मला रात्री 9.27 वा चे सुमारास व्हाटसअप कॉल आला. त्याने मला " तुमच्यावर भरवसा नाही माझा, मी तुज्यासाठी काय काय केल आणि तु लेका साहेबाकड सकाळच्यान बसलाईस

तिथ" असे म्हणाला त्यावेळी मी "आर मगन भाईला आणि तेला विश्वास नाही, तुला आता पैसे दयायच तर विचाराय नगो साहेबाला" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश खोत "आरे मी काय म्हणतोय आईक की, साहेबाला विचाराय, तुला आदेश दिला कि बास झाल ना" असे म्हणाला. त्यानंतर आमचेत कामाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी सुरेश याला मलकापूर स्टॅण्डवर येण्यास सांगितले असता, तो येतो असे म्हणाला. त्यानंतर पाटील मॅडम यांनी लाचेची रक्कम अथ्रासिन पावडर लावलेले 5,00,000/- रूपये माझेकडे दिले. त्यानंतर पुन्हा पाटील मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरू करून तो माझे शर्टचे आतमध्ये दो-याचे सहयाने गळयात अडकवला. त्यानंतर मी व पंच माने असे माझे कार मधुन रात्री 9.40 वा चे सुमारास मलकापूर स्टॅण्डकडे निघालो. आमचे पाठोपाठ सापळा पथक आले. त्यावेळी मी व पंच माने असे मलकापूर स्टॅण्ड परीसरात थांबुन राहीलो. त्यावेळी मला सुरेश खोत याचा व्हाटसअप कॉल आला. त्याने मला "मंदिराजवळ हाय नव्ह का" असे म्हणाला. त्यावेळी मी त्याला "समोर गाडी हाय माझी वॅगनार बघ" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश बर,बर आलो असे म्हणाला. त्यानंतर सुरेश माझेजवळ आला त्यावेळी तो मला मी तहसिलदार चव्हाण यांना का भेटला म्हणुन ओरडु लागला. त्यावेळी मी "कुठाय आदेश आपला" असे म्हणालो त्यावेळी सुरेश खोत "हाय की, तु पैसे दाखीव की, पैसे ते तस नाही, हयो व्यवहार हाय माझा" असे म्हणाला. त्यावेळी "पैसे हाईत हे काय, हे पैसे काय ठेवल्यात, दे आणुन त्यात करा हाय" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश खोत "बघु थांब मला बघितल पाहिजे" असे म्हणाला. त्यावेळी मी "हं. हाईत पैसे, तु कशाला पैसे हाईत की" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश "किती हाईत दाखव" असे म्हणाला. त्यावेळी मी "पाच लाख हाईत" असे म्हणालो. त्यावेळी सुरेश खोत "पाच लाख होय दाखव, मला तेला सांगायला पाहिजे" असे म्हणाला. त्यानंतर आमचेत पैशाचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी "आर हाईत तर, ते आणजा जा, कागद आण" असे म्हणुन सुरेश याने माझेकडे मागणी केलेप्रमाणे 5,00,000/- रूपये सुरेश खोत याचेकडे दिले. त्यावेळी सुरेश याने ते पैसे हातात घेवुन आदेशाचा कागद घेवुन माझेकडे आला व मला, ये की वाचणार नव्ह का , वाचकी तु पहिला असे म्हणाला. त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता पाटील मॅडम,त्यांचा स्टाफ व पंच तेथे आले व त्यांनी लाच स्विकारलेल्या रक्कमेसह सुरेश खोतला रात्री 9.57 वा चे सुमारास पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या नंतर, पुढील सर्व कार्यवाही शाहुवाडी पोलीस स्टेशन मधील एक कक्ष उपलब्ध करून, तेथे पुर्ण करण्यात आली आहे. सुरेश खोत याचे पुर्ण नाव सुरेश जगन्नाथ खोत, वय - 49वर्षे,रा.भैरेवाडी, ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर असे असल्याचे समजले आहे.

तरी माझे मामेभाऊ मगनलाल लखमसिंग पटेल व त्यांचे सह हिस्सेदार यांनी मौजे सावे येथील गट नंबर 616 मधील 1 हेक्टर 32 आर जमीन खरेदी केली असुन, गट नं.616 मधील फेरफार खाडाखोड करून त्यामध्ये चुकीचे गट नंबर नोंद केलेले आहेत. तरी सदर फेरफार मध्ये खाडाखोड करणा-यां विरूध्द योग्य ती कारवाई करून, पुर्ववत सातबारा व फेरफार दुरूस्ती करून मिळावा म्हणुन दिनांक 06/02/2023 रोजी तहसिलदार कार्यालय शाहुवाडी येथे अर्ज दिला होता. सदर अर्जाचा पाठपुरावा मगनलाल यांचेवतीने मी पाहत होतो. सद्या अर्जामध्ये शाहुवाडी तहसिलदार यांचेसमोर सुनावणी चालु आहे. त्या अर्जाची सध्यस्थिती काय आहे हे विचारणा करणेसाठी मी तहसिलदार ऑफीस शाहुवाडी येथे गेलो,त्यावेळी तेथे मला सुरेश जगन्नाथ खोत याने माझे मामेभाऊ मगनलाल यांचे मौजे सावे येथील गट नंबर 616 बाबतचे प्रलबिंत काम तहसिलदार शाहुवाडी रामलिंग चव्हाण साहेब यांचेकडुन पुर्ण करून देतो, त्याकरीता चव्हाण साहेब यांना देणेसाठी माझेकडे 5,00,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन माझेकडे बेकायदेशिरपणे लाचेची मागणी करून, मागणी केलेली लाच रक्कम 5,00,000/- रूपये सुरेश खोत याने माझेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारताना त्यांना अँन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पथकाने पकडल्याने माझी सुरेश जगन्नाथ खोत, (खाजगी इसम) वय - 49 वर्षे, रा.भैरेवाडी, ता. शाहुवाडी, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vijay Baba Gherade(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रत मिळाली

19/03/25

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vijay Baba Gherade

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

ठाणे अमलदार
शाहुवाडी पोलीस ठाणे